नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०५/२०२५ (मंगळवार)**

---

## घरफोडीचा गुन्हा १२ तासाच्या आत उघड , ३ आरोपी अटक
## पोलीस स्टेशन रामटेक यांची कामगीरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— फिर्यादी नामे निलेश जगन मुळे, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. ०२ नगरधन, ता. रामटेक जि.नागपुर यांनी पोलीस स्टेशन रामटेक येथे रिपोर्ट दिली की, दिनांक ०२/०५/२०२५ रोजीचे रात्री ०८/००वा. ते दिनांक ०३/०५/२०२५ चे दुपारी ०२/०० वा. दरम्यान फिर्यादीचे घराचे समोरील दाराचे लॉंक तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मध्ये लोखंडी आलमारीचे लॉंक तोडुन लॉंकर मधील ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने एकुण किंमती ७२,७५०/— रुपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे अप क्र. ३४८/२०२५ कलम ३०५(ए) ,३३१(४), ३३१(३) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक (प्रभारी पोलीस अधिक्षक) नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी रामटेक यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन रामटेक चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री आसाराम शेटे यांनी सदर गुन्हा उघडीकीस आणण्यासकामी पोलीस स्टेशन रामटेक येथील गुन्हे प्रकटीकरण पथका मधील अंमलदारांचे पथक तयार केले. सदर पथकाने तांत्रिक पुरावे आणि गुप्तबातमीदारा मार्फतीने सदर गुन्हात **आरोपी क्र. १) रामा उर्फ बांड्य मारोती दांडेकर, वय २३ वर्षे,रा. गिट्टीखदान नागपुर आरोपी क्र. २) बबलु अंबादास दांडेकर, वय २७ वर्षे आरोपी क्र. ३) गोलु अंबादास दांडेकर, वय २४ वर्षे, दोन्ही रा. गंगानगर वाडी रोड नागपुर** या आरोपीचा **१२ तासाच्या आत शोध** घेवुन त्यांच्या कडे सखोल विचारपुस करून आरोपीतांना अटक केली.

आरोपीकडुन पिवळया आणि पांढऱ्या धातुचे दागिने एकुण किंमती ५१,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. मा. न्यायालयाने नमुद आरोपीतांचा दिनांक ०८/०५/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.




**कारवाई पथक रामटेक पोलीस स्टेशन**

## अवैधरित्या देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई ७ आरोपी विरूध्द ७ गुन्हे नोंद एकुण २९,११०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नगपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०५/०५/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन वेलतुर — ०१ गुन्हा नोंद , खापरखेडा — ०१ गुन्हा नोंद ,पारशिवणी— ०२ गुन्हे नोंद, नरखेड — ०३ गुन्हे नोंद केले. पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल सडवा असा एकुण २९,११०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.७ आरोपीतांवर ७ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने